# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-416 004.

परिपत्रक क्रमांक को.वि.मं./इ. 10 वी परीक्षा मार्च/एप्रिल 2022/ 3313 दिनांक:- 25/03/2022

**विषय :- इ. 10 वी परीक्षेस आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांना शालेय शुल्क न भरणे वा अन्य कारणास्तव शाळेकडुन प्रवेशपत्र उपलब्ध न होण्याच्या प्रकरणात करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

या परिपत्रकान्वये या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी )परीक्षा मार्च/एप्रिल-2022 च्या परीक्षेसाठी मंडळाकडे परीक्षा आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांना मंडळामार्फत दिलेले हॉलतिकीट (प्रवेशपत्र) संबंधीत माध्यमिक शाळाचे मुख्याध्यापक यांचेमार्फत वितरीत करण्यात आलेले आहे.

तथापि, विद्यार्थ्यांना शालेय शुल्क न भरल्यामुळे हॉलतिकीटसाठी विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाणे अथवा विद्यार्थ्यांना हॉलतिकीट न देणे ही बाब महाराष्ट्र विधान परिषद अंतर्गत म. वि. प. नियम 93 अन्वये प्राप्त सूचनेव्दारे उपस्थित करण्यात आली होती. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याबाबत शासनाकडून आदेश प्राप्त झालेले आहेत. तरीसुध्दा इ. 10 वीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र (हॉलतिकीट) मिळण्यास अडचणी येत असल्यास त्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. शालेय शुल्क न भरल्याने मंडळाच्या इ. 10 वी च्या परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉलतिकीट) देण्याबाबत शाळांकडून विद्यार्थ्यांची अडवणूक होत असल्यास अथवा त्यांना हॉलतिकीट प्राप्त होत नसल्यास अशा विद्यार्थ्यांने शाळेशी संबंधीत तालुक्याचे गटशिणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधीत विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक /शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांचेशी त्वरीत संपर्क साधावा.
2. संबंधीत तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधीत विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक/ शिक्षण प्रमुख/ शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकरी यांनी सदर विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र उपलब्ध करुण घेण्यासाठी संबंधीत विभागीय मंडळाचे विभागीय सचिव / विभागीय अध्यक्ष यांचेशी संपर्क साधावा व अशा विद्यार्थ्यांचा तपशील विभागीय मंडळास तात्काळ उपलब्ध करुन द्यावा.
3. संबंधीत तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागातील संबंधित विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक /शिक्षण प्रमुख/शिक्षणधिकारी/प्रशासन अधिकरी यांनी अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र विभागीय मंडळ यांचेकडून सॉफ्ट कॉपी स्वरुपात ई मेलद्वारे उपलब्ध करुन घ्यावे.
4. संबंधीत अधिकाऱ्यांनी सदर सॉफ्टकॉपीची प्रिंट काढावी व त्यातील माहितीची संबंधित विद्यार्थ्यांकडून खातरजमा करुन घ्यावी. आशय योग्य असलेल्या प्रकरणात सदर हॉलतिकीट संबंधीत अधिकाऱ्यांनी स्वत:च्या सही शिक्क्याने प्रमाणित करुन संबंधीत विद्यार्थ्यांस द्यावे. सदर प्रमाणिकरणासाठी हॉलतिकीटवर मुख्याध्यापक यांचेकरीता निर्धारीत केलेली जागा वापरावी.
5. उपरोक्तप्रमाणे सॉफ्ट कॉपीवरुन काढलेल्या प्रिंटमधील आशयामध्ये काही बदल असल्यास याबाबत त्वरीत विभागीय सचिव/ विभागीय अध्यक्ष यांचेशी संपर्क साधून त्यामध्ये बदल करुन घ्यावेत व तद्नंतर हॉलतिकीट प्रमाणित करुन विद्यार्थ्यांना देण्यास यावे.

6. संबंधीत तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अथवा शहरी भागासाठी संबंधीत विभागाचे शिक्षण निरीक्षक/शिक्षण उपनिरीक्षक /शिक्षण प्रमुख ./ शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी यांनी प्रवेशपत्रासंबंधात उपरोक्तप्रमाणे
7. केलेल्या कार्यवाहीचा शाळा व विद्यार्थीनिहाय एकत्रित अहवाल परीक्षा सुरु झाल्यानंतर त्वरीत संबंधित विभागीय सचिव/विभागीय अध्यक्ष यांना लेखी स्वरुपात सादर करावा.
8. उपरोक्त कार्यपध्दतीनुसार प्रवेशपत्र (हॉलतिकीट) प्राप्त करुन घेतलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ करुन घेणेबाबत सूचना संबंधित केंद्रसंचालक व उपकेंद्रसंचालक यांना विभागीय मंडळ स्तरावरुन देण्यात याव्यात.
9. परीक्षा आवेदन पत्र सादर केलेल्या कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.
10. सदर पर्यायी व्यवस्था फक्त मार्च/एप्रिल 2022 परीक्षेसाठी उपलब्ध असेल.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रति,

1.मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा- सातारा,सांगली व कोल्हापूर.
2.शिक्षणाधिकारी (माध्यमिक)- सातारा, सांगली व कोल्हापूर.
3.शिक्षण निरीक्षक, शिक्षण उपनिरीक्षक- सातारा, सांगली व कोल्हापूर.
4.गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अंतर्गत जिल्हा सातारा, सांगली व कोल्हापूर.